CNR No.- MHYA-1800-0906-2015.

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल दिनांक | २९/०६/२०१५ | | |
| नोंदणी दिनांक | २९/०६/२०१५ | | |
| निकाल दिनांक | १७/०८/२०२६ | | |
| कालावधी | ११ | ०१ | १९ |
| | वर्ष | महिने | दिवस |

**घाटंजी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात,**
( पीठासीन अधिकारी पी. आर. पाटील )

---

**नियमीत फौज. खटला क्रमांकः– १३५/२०१५** **निशाणी ४६**

न्यायनिर्णय दिनांक १७/०८/२०२६.
गुन्हा नोंद क्रः– ६४/१०. वन परिक्षेत्र अधिकारी, दक्षिण आर्णी, घाटंजी वन विभाग, ता. घाटंजी. जि. यवतमाळ.

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन तर्फे<br>वन परिक्षेत्र अधिकारी, दक्षिण आर्णी, घाटंजी वन विभाग, ता. घाटंजी. जि. यवतमाळ. |
| अभियोगपक्ष तर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता– श्री. डी. पी. बोरसे. |
| **आरोपी** | | **१. प्रविण पिरू राठोड,**<br>वय– २० वर्ष, धंदा–मजूरी,<br>**२. भोप्या जोधा राठोड,**<br>वय– ३४ वर्ष, धंदा–नोकरी,<br>**३. देविदास किसन चव्हाण,**<br>वय– ३६ वर्ष, धंदा–मजूरी,<br>सर्व रा. चिचबर्डी, ता. आर्णी, जि. यवतमाळ. |
| आरोपीं तर्फे विधिज्ञ | | श्री. ए. एच. पांडे. |

**भाग – ब**

फौजदारी आदेशीकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (२) अन्वये

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडलयाचा दिनांक | :– | २७/०९/२०१४ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २७/०९/२०१४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २९/०६/२०१५ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १२/१२/२०१७ |
| दोषारोपपूर्वी पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | --------- |

| | | |
|---|---|---|
| न्यायनिर्णयासाठी राखुन ठेवल्याचा दिनांक | :– | १७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | १७/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात राखुन ठेवलेला आदेश | :– | निरंक |

## आरोपीची माहीती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. ४२८ अन्वये समायोजीत (set off) कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १<br>२<br>३ | प्रविण पिरू राठोड<br>भोप्या जोधा राठोड<br>देविदास किसन चव्हाण | १३.१०.२०१४<br>--//--<br>--//-- | २८.०९.२०१४<br>--//--<br>--//-- | भारतीय वन अधि., १९२७ कलम २६(१)(फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, ८८, १०५ अन्वये | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग – क
## फौजदारी आदेशीकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (३) अन्वये सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार /बचाव पक्षातर्फे साक्षीदार/ न्यायालयीन साक्षीदार

### अ– अभियोगपक्ष

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १ | चंदन गंगाराम चव्हाण | घटना स्थळ व जप्ती पंचनाम्यावरील पंच | २९ |

### ब– न्यायालयामार्फत निशाणी कागदोपत्रांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३० ते ३२ / सा.क्र. १ | घटनास्थळ, जप्ती व सुर्पुतनामा पंचनामा |

### क - मुददेमाल वस्तु क्रमांक

| अ.क्र. | मुददेमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ----- | १. सागवान चौरस नग १० घ.मी.<br>२. ॲटो क्र. एम.एच.–२९–वाय.–९०७१ |

**:: न्यायनिर्णय ::**

(दिनांक १७ ऑगस्ट, २०२६)

प्रस्तुत प्रकरण आरोपीं विरुध्द भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम २६(१) (फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, ८८, १०५ अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी अभियोग चालिवण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात :-**

०२. फिर्यादी तथा कु. एस. बी. ताकसांडे, वनरक्षक यांनी विद्यमान न्यायालयामध्ये दि. २७/०९/२०१४ रोजी लेखी फिर्याद दाखल केली की, क्षेत्र सहायक, सावळी यांना माहिती मिळाली की, चिचबर्डी वरून सावळी येथे ॲटोमध्ये सागवान कटसाईज वाहतुक होत असल्याचे समजल्यावरून त्यांनी मोटर सायकलने सदर ॲटोचा पाठलाग करून सदर ॲटोस सावळी गावात पकडले. त्यावेळी सदर ॲटोचा चालकास विचारणा केली असता त्यांनी त्यांची नावे आरोपी क्र. १ प्रविण राठोड, आरोपी क्र. २ भोज्या राठोड व आरोपी क्र. ३ देविदास चव्हाण अशी सांगितली. त्यावेळी पंचासमक्ष आरोपींना विचारणा केली असता सागवान चौरस नग १० चिचबर्डीवरून ॲटोने वाहतुक करून आणल्याचे कबुल केले. त्यावेळी तपासामध्ये आरोपी क्र. १ ते ३ हे दोषी आढळुन आल्याने विद्यमान न्यायालयात सदरचा तक्रार अर्ज दाखल केला.

**गुन्हा अन्वेषण :-**

०३. फिर्याद नुसार आरोपीचे विरुध्द पहिले प्रतिवृत्त क्र. ६४/१०, दि. २७/०९/२०१४ रोजी भारतीय वन अधि., १९२७ कलम २६(१) (फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, ८८, १०५ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर प्रकरणाचे तपासादरम्यान, साक्षीदारांची बयाने नोंदवून, घटनास्थळ पंचनामा व ईतर पंचनामे ई. करुन, आरोपींना अटक करुन त्यांच्याविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने, उपरोक्त नमुद कलमांखाली दोषारोप-पत्र दाखल केले आहे.

**दोषारोप निश्चिती व आरोपींचा जबाब :-**

०४. सदर प्रकरणात आरोपींविरूध्द, भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम २६(१) (फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, ८८, १०५ अन्वये निशाणी क्र. २४ वर दोषारोप निश्चित केला व आरोंपीचे निवेदन

अनुक्रमे निशाणी क्र. २५ ते २७ वर नोंदविले आहे. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन, प्रकरणाची संपरिक्षा करणेची याचना केली.

०५. अभियोग पक्षाने आरोपींविरूध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी एका साक्षीदारांची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाला वारंवार संधी देनुवही अभियोग पक्ष हा फिर्यादी व तपासी अधिका-यांना साक्ष देणेकामी हजर ठेवण्यास अपयशी ठरल्यामुळे दि. ०३/०८/२०२६ रोजी नि.क्र. १ वर आदेश पारित करून अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला.

०६. संपरीक्षे दरम्यान अभियोग पक्षाच्या पुराव्या अंती, अभिलेखावर आरोपींचे विरोधात सबळ पुरावा मिळुन आल्याने, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम-३१३(१)(ब) अन्वये आरोंपीचे निवेदन नि.क्र. ४३ ते ४५ अन्वये नोंदवण्यात आले. आरोपींचा बचाव पूर्णपणे नकारात्मक आहे.

०७. सहायक सरकारी अभियोक्ता यांनी अभिलेखानुसार युक्तिवाद केला व आरोपींस शिक्षा ठोठावणेबाबत विनंती केली. आरोपींच्या वतीने विद्वान विधीज्ञानी युक्तीवाद केला की, प्रकरणी पंचनामे शाबीत नाहीत. अभियोगपक्षाच्या वतीने सर्व वन विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची साक्ष नोंदवली नाही, तसेच अभियोगपक्षाने स्वतंत्र साक्षीदार तपासला नाही. त्यामुळे, कथीत गुन्हा आरोपींनी केल्याचे शाबीत होत नाही. याचा विचार करुन आरोपीं विरूध्द कोणताही सबळ पुरावा नसलेमुळे तसेच वन अधिकारी व स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष नोंदवली नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणेबाबत याचना केली.

०८. अभिलेखावरुन पुढील वादप्रश्न विचारार्थ उपस्थित झाले. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील प्रमाणे नोंदिवण्यात येत आहेत;

| **अ. क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करते काय की, दि. २७/०९/२०१४ रोजी मौजा सावळी वन परिक्षेत्रातील आरोपींनी अवैधरित्या सागवान लाकूड तोडून व त्याची कटाई करुन सागचे १० नग आढळून आले व सरकारी वनसंपदेची चोरी करुन अतोनात हानी केली व त्यानुसार भारतीय वन अधिनियम, १९२७ कलम २६(१)(फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, | |

८८, १०५ अन्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय ? : **नाही.**

२. आदेश काय ? : **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात येते...**

## कारणमिमांसा

**वादप्रश्न क्र.१ करीता :-**

०९. साक्षीदार क्र. १ चंदन गंगाराम चव्हाण हे घटनास्थळ तसेच जप्ती पंच आहे. त्यांनी त्यांच्या सरतपासणीमध्ये कथन केले की, ते आरोपींना ओळखतात. तसेच त्यांना पंचनाम्यासाठी फॉरेस्ट ऑफीसला बोलाविले असल्याचे कथन केले. त्यांनी पुढे कथन केले की, घटनास्थळ, जप्ती व सुप्रुतनामा पंचनाम्यावर त्यांची सही असल्याचे जरी ओळखले असले तरी त्यातील मजकुर त्यांना माहिती नसल्याचे कथन केले. परिणामी विद्वान सहायक सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या पुर्व परवानगीने साक्षीदार क्र. १ यांना उत्तर सुचक प्रश्न विचारले असता त्यांनी सर्व प्रश्नांना ठामपणे नकारार्थी उत्तरे दिली व अभियोग पक्षाला कोणतेही सहकार्य दिलेले नाही.

१०. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, साक्षीकामी दुसरे पंच मिथुन बाबुलाल राठोड हे न्यायालयात हजर होवुनही त्यांना अभियोग पक्षाने तपासले नाही. त्याचप्रमाणे तपासी अधिकारी व फिर्यादीला वारंवार साक्ष समन्स काढुनही अभियोग पक्ष त्यांना साक्षकामी हजर करण्यास अपयशी ठरल्याचे दिसुन येते. साक्षीदार क्र. १ चंदन यांनी सुध्दा त्यांच्या पुराव्यामध्ये अभियोग पक्षाला कोणतेही सहकार्य केल्याचे दिसुन येत नाही.

११. एकंदरीत अभियोग पक्ष अभिलेखावरील मौखिक व कागदोपत्री पुरावा पडताळला असता, फिर्यादी पक्षाने आरोपींविरूध्द घटना ठोस व विश्वासहार्य पुराव्यानिशी सिध्द केली नाही. त्यामुळे वादप्रश्न क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदविले आहे.

**वादप्रश्न क्र. २ करीता :-**

१२. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रस्तुत प्रकरणी तपासादरम्यान जप्त मुद्देमाल म्हणजेच ॲटो क्र. एम.एच.–२९–वाय.–९०७१ गाडी जप्त असुन अपील कालावधीनंतर ती आरोपीच्या ताब्यात दिली नसल्यास कागदपत्राचे अवलोकन

करून आरोपीच्या ताब्यात देण्यात यावी व जप्त सागवान चौरस नग १० घ.मी. अपील कालावधीनंतर सागांच्या लाकडांचा लिलाव करून लिलावाची रक्कम हि शासन जमा करण्यात यावी. सबब, उपरोक्त उहापोह विचारात घेता, मी न्यायाच्या दृष्टीने पुढील आदेश करीत आहे;

## <u>आदेश</u>

१) आरोपी नामे **१. प्रविण पिरू राठोड, २. भोप्या जोधा राठोड, ३. देविदास किसन चव्हाण,** सर्व रा. चिचबर्डी, ता. आर्णी यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम-२४८ (१) अन्वये, भारतीय वन अधि., १९२७ कलम २६(१) (फ), ४१, ४२ व मुंबई वनअधिनियम चे कलम ६६, ८२, ८८, १०५ अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यातून निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपींचे बंधपत्र व जमानतपत्र रद्द करण्यात येतात.

३) जप्त मुद्देमाल म्हणजे ॲटो क्र. एम.एच.–२९–वाय.–९०७१ गाडी जप्त असुन अपील कालावधीनंतर ती आरोपीच्या ताब्यात दिली नसल्यास कागदपत्राचे अवलोकन करून आरोपीच्या ताब्यात देण्यात यावी व जप्त सागवान चौरस नग १० घ.मी. अपील कालावधीनंतर सागांच्या लाकडांचा लिलाव करून लिलावाची रक्कम हि शासन जमा करण्यात यावी.

४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या अनुपालनाकरीता, आरोपींनी पुढील सहा महीन्यांकरीता प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/- चे जामीन कदबे द्यावेत.

(न्यायनिर्णय खुले न्यायालयात घोषित केला असे.)

PRAVIN RAMESH PATIL
Digitally signed by PRAVIN RAMESH PATIL
Date: 2026.08.17 16:47:16 +0530

( पी. आर. पाटील )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
घाटंजी, जि.यवतमाळ.

दिनांक :– १७.०८.२०२६.

| | |
|---|---|
| बहस ऐकल्याचा दिनांक | १७.०८.२०२६ |
| आदेश पारीत केल्याचा दिनांक | १७.०८.२०२६ |
| आदेश टंकलिखीत केल्याचा दिनांक | १७.०८.२०२६ |
| आदेशावर सही केल्याचा दिनांक | १७.०८.२०२६ |

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते कि सदर पि.डी.एफ. फाईलच्या आदेशातील मजकुर हा मुळ आदेशाच्या प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

<u>लघुलेखकाचे नाव</u>- ए. एम. सुर्यवंशी (श्रेणी-३)